# किर्लोस्कर इंडस्ट्रिज लिमिटेड

Kirloskar Industries

किर्लोस्कर ग्रुप कंपनी

**नोंदणीकृत कार्यालय :**
ऑफिस नं. 801, ८ वा मजला, सेलो प्लॅटीना,
फर्ग्युसन कॉलेज रोड, शिवाजीनगर, पुणे 411 005
सीआयएन: L70100PN1978PLC088972

## २८ फेब्रुवारी २०२३ रोजी प्रकाशित झालेल्या पोस्टल बॅलेट आणि ई-व्होटिंगच्या वृत्तपत्रातील सूचनेला जोडपत्र

किर्लोस्कर इंडस्ट्रिज लिमिटेड (**''कंपनी''**) यांनी २७ फेब्रुवारी २०२३ रोजी 'प्राधान्य आधारावर परिवर्तनीय वॉरंट जारी करणे' या अनुक्रमांक १ असलेल्या विषयावर, पोस्टल बॅलेट सूचनेमध्ये नमूद केलेल्या अटी व शर्तींवर, विशेष ठरावाद्वारे सभासदांची मान्यता मिळविण्यासाठी कंपनीच्या सर्व सभासदांसाठी पोस्टल बॅलेट सूचना जारी केली होती. सदर पोस्टल बॅलेट सूचना २७ फेब्रुवारी २०२३ रोजी कंपनीच्या सर्व भागधारकांना ईमेल द्वारे पाठविण्यात आली होती.

पोस्टल बॅलेट सूचना जारी केल्यानंतर, नॅशनल स्टॉक एक्सचेंज ऑफ इंडिया लिमिटेड (**''एनएसई''**) यांच्याशी सेबी (लिस्टिंग ऑब्लिगेशन्स अँड डिस्क्लोजर रिक्वायरमेंट्स) रेग्युलेशन्स, २०१५ मधील विनियम २८(१) अंतर्गत प्राधान्य इश्यूसाठी मागितलेल्या तत्वतः मान्यतेच्या संदर्भात केलेल्या पत्रव्यवहाराच्या अनुषंगाने कंपनीने २७ फेब्रुवारी २०२३ च्या पोस्टल बॅलेट सूचनेसंदर्भात एक शुध्दीपत्र जारी केले आहे. या शुद्धीपत्राद्वारे कंपनीने पोस्टल बॅलेट सूचनेमध्ये खालील विषयांच्या संदर्भात काही सुधारणा केल्या आहेत, ज्या पुढे विस्तृतपणे नमूद केल्या आहेत.:

**अ. इश्यू किमतीमध्ये वृध्दी :**

इश्यू किंमत जी आधी प्रति वॉरंट ₹ २,१४५ (रुपये दोन हजार एकशे पंचेचाळीस) होती, ती सुधारित करून आता ₹ २,१९५ (रुपये दोन हजार एकशे पंच्याण्णव) करण्यात आली आहे. पोस्टल बॅलेट सूचना त्यानुसार वाचली जाईल. सिक्युरिटीज अँड एक्स्चेंज बोर्ड ऑफ इंडिया (इश्यू ऑफ कॅपिटल अँड डिस्क्लोजर रिक्वायरमेंट्स) विनियम, २०१८ (आयसीडीआर नियमावली)च्या नियमन १६४(१) नुसार इश्यू किमतीची गणना करण्यासाठी एनएसईच्या निर्देशांनुसार इश्यू किमतीमध्ये ही वृध्दी करण्यात आली आहे.

**ब. जारी करण्यात येणाऱ्या वॉरंट ची कमाल संख्या:**

वर नमूद केल्याप्रमाणे इश्यू किमतीमध्ये झालेल्या वृध्दीच्या परिणामी, वाटप करण्यात येणाऱ्या वॉरंटची एकूण संख्या ४,६६,२०० (चार लाख सहासष्ठ हजार दोनशे) वरून ४,५५,५८० (चार लाख पंचावन्न हजार पाचशे ऐंशी) वॉरंट केली जाईल. पोस्टल बॅलेट सूचना त्यानुसार वाचली जाईल.

संपूर्ण शुद्धिपत्राची प्रत यासोबत जोडली आहे.

बीएसई लिमिटेड (**''बीएसई''**) आणि **एनएसई** यांच्या संकेतस्थळांवर देखील हे शुध्दीपत्र उपलब्ध आहे.

हे शुध्दीपत्र २७ फेब्रुवारी २०२३ च्या पोस्टल बॅलेट सूचनेचा अविभाज्य भाग असेल, जी २७ फेब्रुवारी २०२३ रोजी कंपनीच्या भागधारकांना आधीच वितरित केली गेली आहे आणि जी कंपनी, बीएसई आणि एनएसई च्या संकेतस्थळांवर उपलब्ध आहे. या शुद्धीपत्राद्वारे सुधारित केलेला मजकूर सोडून २७ फेब्रुवारी २०२३ च्या पोस्टल बॅलेट सूचनेमधील इतर सर्व मजकूर अपरिवर्तित राहील.

संचालक मंडळाच्या आदेशानुसार
**किर्लोस्कर इंडस्ट्रिज लिमिटेड** करिता

सही/-
**अश्विनी माळी**
कंपनी सचिव

स्थळ : पुणे
दिनांक : १५ मार्च २०२३

· दूरध्वनी: +91 20 2970 4374 · दूरभाष: +91 20 2970 4374
· ईमेल: investorrelations@kirloskar.com · वेबसाईट : www.kirloskarindustries.com

"Mark bearing word 'Kirloskar' in any form as a suffix or prefix is owned by Kirloskar Proprietary Limited and Kirloskar Industries Limited is the Permitted User"

epaper.loksatta.com